CMYK

नवी मुंबईतू २५ डिसेंबरला विमानाचे पहिले उड्डाण
>> पान 2

लोणार शहराचा एका वर्षात सर्वांगीण विकास करण्याचा शब्द देतो
>> पान 3

न्यायालयीन अपील दाखल झालेल्या नगरपरिषदामधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुधारित निवडणुक कार्यक्रम
>> पान 4

## सुविचार

माणसाने मोठेपण त्याने किती माणसे मोठी केली यावरुन सिद्ध होते. – गोपाळकृष्ण गोखले


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 115 ■ सोमवार, दि. 01 डिसेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





महाराष्ट्राने उंचावली देशाची मान! ‘गोंधळ’ चित्रपटाने जिंकला जागतिक स्तरावरचा मानाचा पुरस्कार

आतील पान

## पुण्यातील पंचतारांकीत हॉटेलला बॉम्बने उडवण्याची धमकी; पोलिसांची धावपळ, कॉल करणारा जेरबंद

**पुणे/प्रतिनिधी :** कोरेगाव पार्कमधील एका प्रसिद्ध पंचतारांकित हॉटेलला बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्यानंतर शुक्रवारी दुपारी मोठी खळबळ उडाली. हॉटेलच्या लँडलाईनवर आलेल्या फोनवर ''हॉटेलमध्ये बॉम्ब ठेवला आहे, तात्काळ हॉटेल रिकामे करा'' अशी धमकी देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि बॉम्ब शोधक पथक तात्काळ हॉटेलवर दाखल झाले. हॉटेलची कसून तपासणी करण्यात आली. मात्र, कोणतीही संशयास्पद वस्तू न आढळल्याने हा कॉल 'फेक' असल्याचे स्पष्ट झाले. अचानक झालेल्या या गोंधळानंतर हॉटेलमधील कर्मचारी आणि ग्राहकांनी सुटकेचा निश्वास टाकला. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हा कॉल एका मोबाईल क्रमांकावरून करण्यात आला होता. प्राथमिक तपासानंतर संबंधित व्यक्तीचा शोध घेऊन त्याला अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी हॉटेलच्या सिक्युरिटी मॅनेजरने कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून ९८३२२५२५१७ या मोबाईल क्रमांकावरून धमकी दिल्याचे नमूद केले आहे. खोडसाळ पद्धतीने केलेला हा प्रकार कोणत्या हेतूने करण्यात आला, याचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## पुण्यात पुन्हा ड्रिंक अँड ड्राईव्ह! कल्याणीनगरमध्ये भीषण अपघात, रेस्टॉरंटमध्येच घातली गाडी, असिस्टंटचा मृत्यू

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे शहरात एक धक्कादायक घटना घडली आहे. पुणे शहरातील कल्याणीनगर परिसरात असणाऱ्या ''टोइट'' रेस्टॉरंच्या पार्किंगमध्ये भीषण अपघात घडला आहे. एका मद्यधुंद चालकाने त्याच्या चार चाकी वाहनाने याच रेस्टॉरंटच्या व्हॅले पार्किंग असिस्टंटच्या अंगावर गाडी घातली. यामध्ये सत्येंद्र मंडल या पार्किंग असिस्टंटचा मृत्यू झाला आहे. येरवडा पोलिसांनी चालकाला ताब्यात घेतला असून तो दारूच्या नशेत असल्याची माहिती सुद्धा समोर आली आहे.

पुण्यातील ड्रिंक अँड ड्राईव्ह च्या वाढत्या प्रकरणांमुळे आता स्थानिकांमध्ये सुद्धा काळजी वाटू लागली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुण्यातील कल्याणीनगर भागात ''टोईट'' नावाचे एक रेस्टॉरंट आहे. दुपारच्या सुमारास, मंडल हा याच रेस्टॉरंट मध्ये व्हॅले पार्किंग असिस्टंट म्हणून काम करतो. दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास, एका भरधाव वाहनाने या रेस्टॉरंटच्या पार्किंगमध्ये एंट्री केली. काही समजायच्या आत हे वाहन थेट व्हॅले पार्किंग काउंटर वर जाऊन धडकले. या ठिकाणी असलेल्या असिस्टंटला या वाहनाने उडवलं. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या असिस्टंटला रुग्णालयात दाखल करण्याचा प्रयत्न केला पण त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून दारुच्या नशेत असलेल्या चालकाला ताब्यात घेतलं आहे. येरवडा पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे.




# हाय अलर्ट जारी! 'डिटवाह' चक्रीवादळामुळे पुढील ४८ तास धोक्याचे

## अनेक राज्यांमध्ये अतिमुसळधार पावसाचा इशारा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** यंदा देशासह महाराष्ट्रात पावसाने धुमाकूळ घातल्याचे पाहायला मिळाले. संपूर्ण देशभरात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला. या अतिरिक्त पावसामुळे अनेक राज्यांना मोठा फटका बसला आणि मोठे नुकसान झाले. महाराष्ट्रालाही यावर्षी मान्सूनचा चांगलाच तडाखा बसला. अतिवृष्टीमुळे अनेक नद्यांना पूर आला. नद्यांना आलेल्या या पुरामुळे ग्रामीण भागामध्ये मोठे नुकसान झाले. अनेक ठिकाणी घरं वाहून गेल्याने अनेकांचा संसार उघड्यावर आला, तसेच पिकांचीही मोठ्या प्रमाणात नासाडी झाली. यामुळे शेतकऱ्यांचा खरीप हंगाम पूर्णपणे हातचा गेला. दरम्यान, आता अनेक राज्यांमध्ये हळूहळू थंडीचा कडाका वाढू लागला आहे. मात्र, थंडी सुरू असतानाच एक मोठी आणि चिंतेची बातमी समोर आली आहे. 'डिटवाह' चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने पुन्हा एकदा अनेक राज्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा 'हाय अलर्ट' जारी केला आहे. या चक्रीवादळामुळे दक्षिणेकडील किनारपट्टीवर आणि आसपासच्या राज्यांमध्ये पुन्हा एकदा अतिवृष्टी होण्याची भीती व्यक्त होत आहे.

श्रीलंकेमध्ये मोठा धुमाकूळ घातलेल्या 'डिटवाह' चक्रीवादळामुळे आता भारताच्या दक्षिण आणि किनारी राज्यांमध्येही मोठा धोका निर्माण झाला आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पुढील ४८ तासांमध्ये या राज्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. जोरदार पावसाचा सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता असलेल्या राज्यांची यादी घ्श ने जाहीर केली आहे. केरळच्या अनेक जिल्ह्यांमध्ये अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. केरळसोबतच तामिळनाडू, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगाणा, पुदुचेरी आणि अंदमान व निकोबार बेटे या ठिकाणी देखील अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. चक्रीवादळ किनारपट्टीकडे सरकत असल्याने पुढील दोन दिवस (४८ तास) हवामानाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत. स्थानिक प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि सुरक्षित स्थळी आश्रय घेण्याचे आवाहन केले आहे.

श्रीलंकेत 'डिटवाह' चक्रीवादळामुळे मोठे संकट उभे राहिले असून, या चक्रीवादळाचा देशाला मोठा तडाखा बसला आहे. या चक्रीवादळामुळे श्रीलंकेमध्ये प्रचंड जीवित आणि वित्तहानी झाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, या चक्रीवादळामुळे देशात शेकडो जणांचा मृत्यू झाला असून, अनेक जण बेपत्ता आहेत. बेपत्ता लोकांचा सध्या शोध घेतला जात असल्याने, मृत्यूचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. श्रीलंकेच्या अनेक भागांमध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात मालमत्तेचेही नुकसान झाले आहे. दरम्यान, श्रीलंकेत विध्वंस केल्यानंतर आता हे चक्रीवादळ भारताच्या दिशेने सरकले आहे. भारतीय हवामान विभागाने या संदर्भात इशारा दिला आहे. आयएमडी ने दिलेल्या माहितीनुसार, पुढील २४ ते ४८ तासांमध्ये भारतात हवेचा वेग प्रचंड वाढण्याची शक्यता आहे. किनारी भागांमध्ये प्रति तास ९० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यामुळे भारत सरकार आणि किनारपट्टीवरील राज्यांमध्ये सतर्कतेचे निर्देश देण्यात आले आहेत.




महाराष्ट्राची स्थिती काय?

डिटवाह चक्रीवादळ दक्षिण भारताच्या दिशेने सरकत असले तरी, त्याचा परिणाम महाराष्ट्रातील हवामानावरही होणार आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्याच्या अनेक भागांमध्ये पुढील दोन दिवस हवामानात बदल जाणवणार आहेत. चक्रीवादळाच्या प्रभावामुळे राज्याच्या अनेक भागांमध्ये ढगाळ वातावरण कायम राहणार आहे. यामध्ये प्रामुख्याने विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. शेतकऱ्यांनी शेतमालाची काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. याउलट, विदर्भाचा अपवाद वगळता उर्वरित महाराष्ट्रात मात्र थंडीचा कडाका (एनीा ण्दत्) वाढणार आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, ढगाळ वातावरण आणि वाऱ्याच्या बदलांमुळे राज्यातील बहुतांश भागांत तापमानात घट होऊन थंडीत वाढ होईल.

## तिजोरीच्या चाव्या माझ्याकडे या वक्तव्यावरून अजित पवारांची सारवासारव; म्हणाले, माझ्यापेक्षा मुख्यमंत्र्यांकडे

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात नगरपालिका आणि नगरपरिषदेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून प्रचार अंतिम टप्यात आला आहे. अनेक ठिकाणी महायुतीमधील पक्ष आमने-सामने आहेत. त्यामुळे चांगलंच राजकारण तापलं आहे. यातच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एका सभेत बोलताना म्हटलं होतं की, ''तुम्ही राष्ट्रवादीच्या उमेदवारांना मतदान करा, तुमच्या भागाला निधी कमी पडू देणार नाही. तुमच्या हातात मत आहे, तर माझ्या हातात निधी आहे.'' त्यांच्या या वक्तव्यानंतर राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनीही म्हटलं होतं की, ''अजित पवारांच्या हातात राज्याच्या तिजोरीच्या चाव्या आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीला मतदान केल्यास निधी मिळेल.''

यावरून भाजपा आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू झाले होते. यानंतर आता अजित पवार यांनी त्यांच्या वक्तव्यावरून सारवासारव केली आहे. तसेच आपण ओघाओघात तसं बोलून गेलो. मात्र, माझ्यापेक्षा जास्त अधिकार हे मुख्यमंत्र्यांकडेच आहेत, असं म्हणत एका सभेत बोलताना अजित पवार यांनी त्यांच्या वक्तव्यावरून अखेर सारवासारव केली आहे.

अजित पवार काय म्हणाले?

''उद्या या ठिकाणी मुख्यमंत्री आले तर ते देखील त्यांची भूमिका मांडतील. तुम्ही सर्व विचार करा. मी परवा कुठेतरी बोलताना म्हणालो की तिजोरीच्या चाव्या माझ्याकडे आहेत. पण तो बोलण्याचा भाग होता. शेवटी जनता जनार्धन सर्व काही असतात. लगेच बाकीच्यांनी सांगितलं की चावी तुच्याकडे आहे, पण तिजोरी आमच्या खोलीमध्ये आहे. आरे पण कोणाच्याही खोलीत तिजोरी असूद्या, काय करायचंय? राज्याच्या जनतेची तिजोरी आहे. माझ्या बापाची पण नाही आणि इतरांच्याही बापाची नाही, ही गोष्ट खरी आहे'', असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

''मी बोलता बोलता ओघात बोलून गेलो. त्यानंतर लगेच मीडिया आणि बातम्या. पण माझ्याकडे जो काही अधिकार आहे तो आहेच आणि माझ्यापेक्षा जास्त अधिकार मुख्यमंत्र्यांकडे आहेत, हे देखील मी मान्य करतो. माझ्याकडे जो अधिकार आहे, त्या आधारावर विकासाला मदत करणं हे माझं कर्तव्य आहे'', असं अजित पवार म्हणाले आहेत.

अजित पवार काय म्हणाले होते?

अजित पवार धाराशिवमध्ये मतदारांना म्हणाले होते की, ''बाकीच्या सगळ्या गोष्टी डोक्यातून काढा. अजिबात काही विचार करू नका. तुम्ही मला सर्व १८ उमेदवार निवडून दिले तर तुम्हाला सांगितलेलं सगळं तयार आहे (तुम्हाला दिलेली सगळी आश्वासनं पूर्ण केली जातील). तुम्ही माझ्या उमेदवारावर फुली मारली तर मी पण फुली मारणार. मत देणं हे तुमच्या हातात आहे. निधी देणं माझ्या हातात आहे. बाकी बघा तुम्ही. माझ्या हातात राज्य सरकारची तिजोरी आहे. माझ्या घड्याळाच्या पाठीशी उभे राहिलात तर बारामतीसारखा



विकास तुमच्याकडे करू शकतो. अर्थमंत्री म्हणून मी धाराशिवकडे बारकाईने लक्ष देईन.''

चंद्रकांत पाटलांनी दिलं होतं प्रत्युत्तर

कोल्हापुरातील प्रचारसभेत चंद्रकांत पाटील म्हणाले होते की, तिजोरीची चावी अजित पवारांकडे असली तरी मुख्यमंत्री आमचे असल्यामुळे, तिजोरीचा मालक आमच्याकडे आहे. तिजोरी तुमच्याकडे असली तरी मालक आमच्याकडे आहे. विरोधक म्हणतील की त्यांच्या हाती राज्याच्या तिजोरीच्या चाव्या आहेत. पण मालकाच्या परवानगीशिवाय तिजोरी उघडता येत नाही. परवानगीशिवाय ती उघडली तर त्याला काय म्हणतात ते तुम्हाला माहितीच आहे'', असं चंद्रकांत पाटील म्हणाले होते.

## जळगावमधील सुवर्ण पेढ्यांना लुटणाऱ्या महिलेला लाखोंच्या मुद्देमालासह उत्तर प्रदेशातून अटक

**दैनिक आपला विदर्भ**

जळगाव/**प्रतिनिधी :** शहरातील तीन नामांकीत सुवर्ण पेढ्यांमध्ये महिनाभरापूर्वी हातचलाखी करून सोन्याच्या अंगठ्या चोरणाऱ्या महिलेला पोलिसांनी उत्तर प्रदेशातील बरेलीतून अटक केली आहे. तिच्याकडून जळगावसह छत्रपती संभाजीनगरातून चोरलेला लाखो रूपयांचा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे.

महिलेने २७ ऑक्टोबरला सर्वात आधी जळगाव शहरातील रतनलाल सी. बाफना ज्वेलर्समध्ये चोरीचा यशस्वी प्रयत्न केला होता. अंगठ्या ठेवण्याच्या ट्रेमधील सोन्याच्या अंगठ्या काढून त्या जागी तिच्याकडील दोन नकली अंगठी ठेवल्याचे सेल्समन गिरीश जैन यांच्या लक्षात आले होते. त्यानंतर सीसीटीव्हीचे चित्रण तपासले असता, दुपारी पाच वाजेच्या सुमारास एक महिला शोरूममध्ये सोने खरेदीच्या बहाण्याने आली होती. सेल्समन इतर डिझाईनचे ट्रे घेण्यासाठी खाली वाकल्यानंतर तिने स्वत:जवळ असलेल्या दोन नकली अंगठ्या टॅगसह ट्रेमध्ये ठेवून सुमारे एक लाख ८५ हजार रूपये किमतीच्या दोन अस्सल सोन्याच्या अंगठ्या घेऊन पोबारा केला होता.

जळगाव शहरातील भंगाळे ज्वेलर्समध्येही २७ तारखेला एका महिलेने दुपारी साडेपाचच्या सुमारास हातचलाखी करून सुमारे १३ ग्रॅम वजनाची सुमारे एक लाख ४५ हजार रूपये किमतीची सोन्याची अंगठी चोरली होती. अर्ध्या तासाच्या अंतराने दोन्ही दुकानांमधून जवळपास ३० ते ३५ ग्रॅम वजनाच्या अंगठ्या महिलेने लंपास केल्याचे निदर्शनास आल्यानंतर शनिपेठ पोलीस ठाण्यात महिलेच्या विरोधात दुसरा गुन्हा नोंदवण्यात आला होता. याशिवाय, जिल्हापेठ पोलीस ठाण्यात एक नोव्हेंबरला दाखल तक्रारीनुसार जळगावमधील पु. ना. गाडगीळ सुवर्ण पेढीतुनही एका महिलेने २७ तारखेला सायंकाळी सहा ते सातच्या सुमारास १० ग्रॅम वजनाची एक लाख ४० हजार किमतीची सोन्याची अंगठी चोरल्याचे उघडकीस आले होते. तिन्ही सुवर्ण पेढ्यांमधील चोरीच्या घटनांचे साम्य लक्षात घेता एकाच महिलेचा त्यात हात असल्याचा संशय बळावला. त्यादृष्टीने पोलिसांनी सीसीटीव्ही चित्रणाच्या आधारे त्या महिलेचा शोध सुरू केला.

## सई ताम्हणकर, भाऊ कदम, सिद्धार्थ जाधव, मकरंद देशपांडे, मुरली शर्मासह कुमार शानू यांना २५ वा नटसम्राट बालगंधर्व पुरस्कार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** नटसम्राट बालगंधर्व पुरस्कार माझ्या हस्ते देणं हा माझाही सन्मान आहे...'' अशा भावना केंद्रीय सांस्कृतिक कार्यमंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी व्यक्त केल्या. ज्या काळात कोणतेही इफेक्ट नव्हते त्या काळात बालगंधर्वांनी सगळ्यांवर मोहिनी घातली होती... ही बालगंधर्व नावाची मोहिनी पुढची अनेक दशके कायम राहील असा विश्वास देखील गजेंद्रसिंह शेखावत यांनी २५ व्या बालगंधर्व पुरस्कार कार्यक्रमात बोलताना व्यक्त केला. साई दिशा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित २५ व्या नटसम्राट बालगंधर्व पुरस्कारांचं वितरण नुकतंच मुंबईत करण्यात आलं. २०२५ ला ''नटसम्राट बालगंधर्व पुरस्कार'' सोहळ्याला २५ वर्ष पूर्ण होत आहेत. यंदा



हा पुरस्कार सोहळा खूपच खास होता. अनेक मान्यवरांनी या सोहळ्याला हजेरी लावली. मुंबईतल्या माटुंगा इथल्या यशवंत नाट्यगृहात ''नटसम्राट बालगंधर्व पुरस्कार'' सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला.

सिने सृष्टीतील योगदानासाठी मकरंद देशपांडे, मुरली शर्मा, सई ताम्हणकर, भाऊ कदम, सिद्धार्थ जाधव यांचा नटसम्राट बालगंधर्व पुरस्काराने केंद्रीय सांस्कृतिक कार्यमंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.. यावेळी राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार उपस्थित होते. गायन विभागात या पुरस्काराचे मानकरी ठरले कुमार सानू, पियुष पनवर.. कुमार सानू यांनी पुरस्कार स्विकारल्यानंतर केलेल्या शानदार सादरीकरणाने उपस्थितांची मनं जिंकली..

सेवा रत्न पुरस्कारमध्ये सुहास दिवसे (जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे), एम.आय.डी.सी. चे संयुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजित कुंभार आणि महापारेषणच्या कार्यकारी संचालक सुचिता भिकाने यांनाही त्यांच्या प्रशासकीये सेवेतल्या योगदानासाठी सेवा रत्न पुरस्कारने गौरवण्यात आले. तर धर्मप्रचार आणि अध्यात्मिक क्षेत्रातील कार्यासाठी कालीपुत्र श्री कालीचरण महाराज यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं. ''नटसम्राट बालगंधर्व पुरस्कार'' दत्तात्रय माने यांच्या नेतृत्वाखाली साईदिशा प्रतिष्ठान गेल्या २४ वर्षापासून काम करत आहे.. नारायण श्रीपाद राजहंस उर्फ बालगंधर्व यांच्या नावे ''नटसम्राट बालगंधर्व पुरस्कार'' विविध क्षेत्रातील योगदानासाठी दिला जातो.. यावर्षी पहिल्यांदाच हा पुरस्कार सोहळा मुंबईत आयोजित करण्यात आला होता.

ज्या काळात स्त्री नटी म्हणून नाटकात अभिनय करू शकत नव्हती अशावेळी बालगंधर्वांनी रंगमंचावर लक्षणीय स्त्री उभी केली. ए.आय. कितीही पुढारलं तर माणसाची जागा घेऊ शकणार नाही असं अभिनेते मकरंद देशपांडे यांनी सत्काराला उत्तर देतांना सांगितलं. आपल्या घरच्यांची केलेला सन्मान खूप जास्त जवळचा असल्याचं म्हणत अभिनेत्री सई ताम्हनकर यांनी आयोजकांचे आभार मानले. तर भाऊ कदम यांनीही बालगंधर्वांच्या नावाचा पुरस्कार दिल्याबद्दल आभार मानतानाच साईदिशा प्रतिष्ठान आणि दत्तात्रय माने यांचाही विशेष उल्लेख केला.

CMYK

## बहुपत्नीत्वाचा विरोधच हवा!

हिंदू धर्मातील कुप्रथांविरोधात आवाज उठविणारे कथित पुरोगामी आणि बुद्धिजीवी हे अन्य धर्मातील कुप्रथांबद्दल सोयीस्कर मौन बाळगून असतात. बहुपत्नीत्वाची प्रथा मुसलमानांमध्ये आजही धार्मिक सबबीखाली सुरू आहे. या प्रथेतून बालविवाह, लैंगिक शोषण, परित्यक्ता वगैरे इतरही अनेक समस्या उद्भवतात. त्याविरोधात कायदेशीर इलाज करणे गरजेचे बनले असून, समान नागरी कायदा हाच त्यावरील उपाय. मुस्लीम समाजात बहुपत्नीत्वाची प्रथा आजही सुरू आहे. तिला धार्मिक मान्यता असल्याची लंगडी सबब पुढे केली जाते; पण ही प्रथा बंद होऊ शकत नाही, असे नाही. तिहेरी (तोंडी) तलाकलाही धार्मिक मान्यता असल्याचे सांगितले जात होते; पण केंद्र सरकारने त्याविरोधात कायदा केल्यावर तिहेरी तलाकला धार्मिक मान्यता नसल्याचे न्यायालयात सिद्ध झाले आणि भारतातील असंख्य मुस्लीम स्त्रियांना मोठा दिलासा मिळाला. तिहेरी तलाकइतकीच आणखी एक कुप्रथा आजही या समाजात सर्रास प्रचलित आहे, ती म्हणजे बहुपत्नीत्वाची. मुस्लीम पुरुष पहिली पत्नी असतानाही आणखी तीन स्त्रियांशी लग्न करू शकतो, अशी तरतूद मुस्लीम वैयक्तिक कायद्यात आहे. तिला धार्मिक आधार असल्याचे सांगितले जाते. मात्र, बहुपत्नीत्वाची तरतूद हा अपवाद आहे, नियम किंवा सर्रास प्रथा नाही याकडे सोयीस्कररीत्या दुर्लक्ष केले जाते. बहुपत्नीत्व हे फक्त एकापेक्षा अनेक स्त्रियांशी विवाह करण्यापुरते मर्यादित राहात नाही. त्यातून या समाजात बालविवाह आणि मानवी तस्करी, तसेच महिलांचे लैंगिक व आर्थिक शोषण यांसारख्या अनेक दुष्प्रवृत्तीही निर्माण होतात. नवऱ्याने टाकलेल्या परित्यक्तांचीही समस्या निर्माण होते. त्यामुळे या प्रथेविरोधात कायदेशीर इलाजाची तीव्र गरज आहे. या प्रथेमुळे मुस्लीम महिलांच्या जीवनात गंभीर समस्या उत्पन्न होत असल्याने अनेक महिलांनी ही प्रथा बंद व्हावी, अशी मागणी केली आहे. यासंदर्भात 'भारतीय मुस्लीम महिला आंदोलन' या संघटनेने नुकताच एक अहवाल सादर केला असून, त्यात मुस्लीम महिलांच्या धार्मिक हक्कांबद्दल आणि बहुपत्नीत्वाशी संबंधित धक्कादायक आकडेवारी सादर करण्यात आली आहे. या अहवालातील दोन हजार ५०८ महिलांपैकी सुमारे ८५ टक्के महिलांनी बहुपत्नीत्वाची प्रथा कायद्याने बंद करावी, अशी मागणी केली आहे. ज्या महिलांचे सर्वेक्षण करण्यात आले, त्यापैकी ८५ टक्के महिलांना ही प्रथा अमानवी आणि असह्य वाटते. बहुपत्नीत्वामुळे अनेक महिलांना शारीरिक, मानसिक, भावनिक, आर्थिक आणि इतर अनेक प्रकारचे त्रास सहन करावे लागतात. त्यांच्या आत्मसन्मान आणि मानवी प्रतिष्ठेवर या प्रकाराचा गंभीर परिणाम होतो, असे या सर्वेक्षणात आढळून आले आहे. त्याचा तपशील ही प्रथा बंद करण्यासाठी कौटुंबिक कायद्यात मोठी सुधारणा करण्यास सरकारला प्रेरित करील, असे वाटते. या प्रथेमुळे घरात तोंड दाबून अन्याय सहन करीत असलेल्या असंख्य महिलांच्या वेदनेला आवाज देण्याचा या अहवालाचा उद्देश आहे. हा अहवाल सादर करताना या संस्थेच्या सह-संपादक झाकिया सोमण, नूरजहान साफिया नियाझ, 'इंडियन मुस्लिम्स फॉर सेयुलर डेमॉक्रसी'चे जावेद आनंद, फिरोज मित्तीबोरवाला, 'विझ्डम फाऊंडेशन'च्या महासंचालिका डॉ. झीनत शौकत अली आणि 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'चे अध्यक्ष डॉ. शमसुद्दिन तांबोळी यांनी ही मागणी केली आहे. या अहवालातील काही आकडेवारी धक्कादायक आहे. या अहवालानुसार, दोन्ही गटांतील (पहिली पत्नी, दुसरी पत्नी) महिलांचे वय ३१ ते ५० वर्षांदरम्यान आहे. ५९ टक्के महिलांचे शिक्षण इयत्ता दहावी किंवा त्यापेक्षा कमी इयत्तेपर्यंत झाले आहे. जवळपास निम्म्या (४५ टक्के) महिलांना कोणतेही उत्पन्न नाही. दोन तृतीयांश (६५ टक्के) महिला दरमहा पाच हजार वा त्यापेक्षा कमी रुपये कमावतात. यापैकी ७२ टक्के महिलांचे लग्न १८-३० या वर्षांच्या वयोगटात झाले असून, या समाजात आजही बालविवाह होत असतात. ६१.४ टक्के पहिल्या पत्नींना 'मेहेर' मिळालेला नाही. ३२ टक्के दुसऱ्या पत्नींना 'मेहेर' मिळालेला नाही. दोन हजार ५०८ महिलांपैकी ३०.५ टक्के महिलांना केवळ ७८६ रुपये इतकाच मेहेर मिळालेला आहे. अनेक महिलांनी 'निकाहनामा'ही वाचलेला नाही. सुमारे ४५ टक्के पहिल्या पत्नींना पतीने दुसरा विवाह केल्यावर निद्रानाश, चिडचिड, नैराश्य यांसारख्या विकारांचा त्रास सुरू झाला. मुस्लिमांशीसंबंधित कोणताही कायदा करण्याची चर्चा सुरू झाली की, भले-भले जाणकार त्यावर सोयीस्कर मौन बाळगतात. हिंदूंमधील वाईट प्रथांवर कंठशोष करणाऱ्या बुद्धिजीवींची आणि पुरोगामी नेत्यांची अशावेळी वाचाच बसते. धार्मिक बाबीच्या सबबीवर या समाजात आजही बहुपत्नीत्वासारखी कुप्रथा राजरोस सुरू आहे. या प्रथेमुळे असंख्य महिलांची आयुष्ये उजाड झाल्याचे डोळ्यासमोर दिसत असतानाही त्याविरोधात कथित पुरोगामी विचारवंत काहीच बोलत नाहीत. हिंदू समाजातील अनेक कुप्रथा पूर्वीच बंद झाल्यामुळे असंख्य हिंदू महिलांच्या जीवनात गुणात्मक सुधारणा झाल्याचे दिसून येते. आज असंख्य हिंदू महिला या उच्चविद्याविभूषित असून, त्या स्वतःच्या पायावर उभ्या आहेत. त्या तुलनेत मुस्लीम समाजातील महिलांची स्थिती भयावह म्हणावी अशीच आहे, हे या आकडेवारीवरून दिसून येते. या समाजातून या प्रथेवर बंदी घालण्याची मागणी करणारे निपजतील, अशी आशाही करण्यासारखी स्थिती नाही. याचा अर्थ, केंद्र सरकारने या अन्यायाकडे हताशपणे पाहात राहावे, असा होत नाही. ही प्रथा बंद होऊ शकत नाही, असे नाही. कारण, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांनी आता त्या राज्यात 'बहुपत्नीत्व' बेकायदा ठरविणारे विधेयकच सादर केले आहे. त्याचे कायद्यात रूपांतर झाल्यास तो सर्व धर्माच्या नागरिकांना लागू होईल. त्यात पहिल्या पत्नीची माहिती दडवून दुसरे लग्न केल्यास दोषींना दहा वर्षे, तर बेधडक बहुपत्नीत्वाचा अवलंब केल्यास सात वर्षे तुरुंगवासाची तरतूद केली आहे. इतकेच नव्हे, तर एखाद्या विवाहित पुरुषाचे पहिले लग्न वैध असताना त्याला दुसऱ्या महिलेशी लग्न लावण्यास आणि हे सत्य दडविण्यात मदत करणाऱ्या त्या गावाच्या प्रमुखाला, काझीला, आईवडिलांना किंवा कायदेशीर पालकांनाही दोन वर्षे कारावासाची शिक्षा देण्याची तरतूद त्यात आहे. बहुपत्नीत्वाचा अवलंब करणाऱ्या व्यक्तीला राज्य सरकारची नोकरी दिली जाणार नाही. तसेच, अशी व्यक्ती पंचायतराज, नगरपालिका वगैरे स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढविण्यास अपात्र ठरेल. बिस्व सरमा यांना जर या परिस्थितीत सुधारणा घडविण्यासाठी कायदा करता येतो, तर अन्य राज्यांतील मुख्यमंत्रीही अशा प्रकारचा कायदा करू शकतात. केंद्र सरकारही पुढाकार घेऊ शकते. प्रश्न इच्छाशक्तीचा आहे!

# नवी मुंबईतू २५ डिसेंबरला विमानाचे पहिले उड्डाण

## पॅसेंजर सिम्युलेशन टेस्ट यशस्वी, शेकडो स्वयंसेवकांकडून रंगीत तालीम

**दैनिक आपला विदर्भ**

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदींच्याहस्ते लोकार्पण झालेल्या नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विम ानतळावरून २५ डिसेंबर रोजी पहिले प्रवाशी विमान उडणार आहे. या दृष्टीने विमानतळ प्रशासनाने २९ आणि ३० नोव्हेंबर रोजी पहिली प्रवासी चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. त्याम ुळे, २५ डिसेंबरपासून विमानतळावर नियमित उड्डाणांना सुरुवात होणार आहे. या उड्डाणाच्या दृष्टीने ही चाचणी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. एकप्रकारे हे विमान प्रवासाचे मॉकड्रीलच होतं असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.



शेकडो स्वयंसेवकांना प्रवासी बनवून पूर्ण प्रक्रियेचे सिम्युलेशन करण्यात आले. यात चेक-इन, सुरक्षा तपासणी, बोर्डिंग प्रक्रिया आणि बॅगेज क्लेमपर्यंत सर्व टप्प्यांची काटेकोर तपासणी करण्यात आली. इंडिगो, अकासा आणि एअर इंडिया एक्स्प्रेस या विमान कंपन्यांनी या ट्रायलमध्ये सहभाग घेतला होता. १९,६५० कोटी रुपयांच्या खर्चाने विकसित करण्यात आलेलं हे देशातील सर्वात मोठं ग्रीनफिल्ड विमानतळ ठरणार आहे. मुंबईतील णएश्धअ विमानतळावरील वाढत्या प्रवासी गर्दीचा भार कमी करण्यास ञ्श्धअ महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. त्यामुळे, आता २५ डिसेंबर रोजी येथून पहिलं विमान कोणत्या शहरासाठी, देशासाठी उड्डाण करतं आणि त्यातील प्रवासी कोण राहतील, याची उत्सुकता सर्वानाच आहे.

नवी मुंबईतून पहिल्या उड्डाणासाठीचे बुकींग यापूर्वीच सुरू झाले असून इंडिगोचे भाडे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळापेक्षा अधिक, तर अकासा एअरचे भाडे त्याउलट कमी असल्याचं समोर आलं होतं. अकासा एअरनंतर इंडिगोकडूनही नवी मुंबईवरुन उड्डाणांची नोंदणी सुरू केल्याची माहिती आहे. इंडिगोकडून नवी मुंबईवरून १० भारतीय शहरांसाठी उड्डाणांची सुविधा उपलब्ध तर अकासाकडून दिल्ली, कोच्ची, गोवा आणि अहमदाबादसाठी सेवा नियमितसुरू राहणार आहे. या विमानतळाचे उद्घाटन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ८ ऑक्टोबर रोजी झाले होते. उद्घाटनानंतर केवळ दोन महिन्यांत विमानतळ पूर्ण क्षमतेने उड्डाण सेवेसाठी सज्ज झाले आहे.

नवी मुंबईवरुन विमान भाडे - २५ डिसेंबरसाठी

दिल्लीसाठी -
इंडिगो - ६ हजार २७४ रुपये
अकासा - ५ हजार ७७६ रुपये
नागपूरसाठी -
इंडिगो - ७ हजार २६७ रुपये
कोच्चीसाठी -
इंडिगो - ९ हजार ११६ रुपये
अकासा - ७ हजार ३७३ रुपये

मुंबई विमानतळावरुन विमान भाडे - २६ डिसेंबरसाठी

दिल्लीसाठी -
इंडिगो - ६ हजार ११६ रुपये
अकासा - ५ हजार ७७६ रुपये
नागपूरसाठी -
इंडिगो - ५ हजार ७४४ रुपये
कोच्चीसाठी -
इंडिगो - १५ हजार ४३४ रुपये
अकासा - २४ हजार १६० रुपये

# विरोधकांनी निकालापूर्वीच पराभव मान्य केला;

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कोकणात शिवसेना भक्कम



**चिपळूण/प्रतिनिधी :** राज्यात सुरू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत प्रचारासाठी केवळ महायुतीचे नेते फिरताना दिसत आहेत. महाविकास आघाडी कुठेही दिसत नाही. त्यांनी निकालापूर्वी पराभव मान्य केला आहे,असे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रत्नागिरी जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना लांजा व चिपळूण येथे घेतलेल्या प्रचार सभेत सांगितले. कोकण हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये आपण आपला गड पुन्हा राखू असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

चिपळूण पालिकेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना, भाजप आरपीआय एकत्रित निवडणुकीला सामोरे जात आहे. युतीच्या उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी शिंदे यांनी आज चिपळूण येथे सभा घेतली यावेळी त्यांनी विरोधी पक्षावर टीका केली. ते म्हणाले, मी उपमुख्यमंत्री असताना अडीच वर्षात अनेक विकास कामे केली. महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेले. एसटीच्या माध्यमातून महिला, वयोवृद्ध, तरुण युवक यांच्यासाठी सवलतीच्या योजना सुरू केल्या. लोककल्याणकारी योजना सुरू केल्या.

महिला सक्षमीकरणासाठी योजना सुरू केल्या. बचत गटांच्या माध्यमातून महिला सक्षम व्हाव्यात यासाठी प्रयत्न केले.लाडकी बहीण योजना सुरू केली. त्यावेळी माझ्यावर प्रचंड टीका झाली. ही योजना बंद पडावी यासाठी अनेक अडथळे निर्माण केले गेले. लाडकी बहीण योजना फसवी असल्याचे विरोधकांनी सांगितले. परंतु आजही ती योजना सुरू आहे. महाराष्ट्रातील मुली उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये. शिक्षणाची फी भरण्यासाठी पैसे नाही म्हणून राज्यात काही मुलींनी आत्महत्या केल्या.त्याची दखल घेऊन मी त्यांना शंभर टक्के शिक्षणाच्या सवलत योजना सुरू केल्या. त्याची पोच पावती म्हणून राज्यात पुन्हा युतीचे सरकार आले.

मला विश्वास आहे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये समाजातील सर्व घटक आणि विशेष लाडक्या बहिणी महायुतीच्या उमेदवारांना निवडून देतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राला विकासाच्या दिशेने पुढे नेत आहेत.पंतप्रधान नरेंद्र म ोदी यांच्या मार्गदर्शनाखाली देशाची प्रगती होत आहे. मोदींमुळे भारताकडे वाकड्या नजरेने बघण्याची शत्रू देशाची हिंमत होत नाही. असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

मी कोल्हापूर मध्ये सभा घेतली तेव्हा एक मुस्लिम महिला मला तिच्या लहान मुलीसह भेटण्यासाठी आली.मी मुलीचे नाव विचारल्यावर दुवा असे तिने सांगितले.लहान वयात या मुलीवर शस्त्रक्रिया करण्यासाठी त्या महिलेकडे पैसे नव्हते.मुख्यमंत्री सहायता निधीतून तिला मी आर्थिक सहाय्य केले होते.त्यामुळे गंभीर आजारातून ती लहान मुलगी बाहेर पडली.त्यानंतर माझे आशीर्वाद घेण्याकरता ती कोल्हापूरला सभेच्या ठिकाणी आली.मी मुख्यमंत्री म्हणून काम करताना जात धर्म पंथ याला ठराव दिला नाही. सर्व समाजाच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

# एड्सविरुद्धची समाजक्रांती : आजारापेक्षा कलंक घातक

दरवर्षी १ डिसेंबर हा दिवस 'जागतिक एड्स दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व केवळ वैद्यकीयदृष्ट्या नसून सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि मानवी मूल्यांच्या स्तरावर अत्यंत मोठे आहे. कारण एड्स हा आजार मानवी शरीरावर जितका परिणाम करतो त्याहून अधिक तो सामाजिक मनोवृत्ती, पूर्वग्रह, भीती, अज्ञान आणि विषमता यांच्याशी संबंधित आहे. एड्सविषयी बोलताना जगाला सर्वप्रथम जे शिकावे लागले ते म्हणजे हा आजार वैद्यकीय उपचारांनी काही प्रमाणात नियंत्रित होऊ शकतो, पण समाजातील भीती, तिरस्कार आणि भेदभावाविरुद्धची लढाई अधिक कठीण आहे. त्यामुळेच जागतिक एड्स दिवस हा केवळ स्मरणदिन नसून जाणीव, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारीची आठवण करून देणारा दिवस आहे.




एचआयव्ही आणि एड्सचा इतिहास पाहिला तर १९८० च्या दशकात जेव्हा हा आजार जगासमोर आला, तेव्हा विज्ञानापेक्षा अफवा, संशय आणि अंधविश्वास अधिक वेगाने पसरले. हा आजार 'पाप', 'अनैतिकता', 'भ्रष्ट वर्तन' किंवा 'सामाजिक अधःपतन' यांचे प्रतीक मानला जाऊ लागला. त्यामुळे एचआयव्हीग्रस्त व्यक्तीला लागणारा धक्का हा आजारापेक्षा समाजाच्या प्रतिक्रिया, बहिष्कार आणि मानसिक तणावामुळे जास्त गंभीर होता. समाजशास्त्र सांगते की कोणताही रोग हा केवळ शरीराशी संबंधित नसतो; तो समाजाच्या मूल्यव्यवस्था, नैतिकता, सत्ता, आर्थिक स्थिती आणि सांस्कृतिक मनोवृत्तीशी जोडलेला असतो. एड्स या आजाराने हे सत्य स्पष्ट केले.

आज जगात एचआयव्हीवर उपचार उपलब्ध आहेत. 'अँटी रेट्रो व्हायरल थेरपी'मुळे एचआयव्हीसह दीर्घायुषी, निरोगी आणि सन्मानाने जीवन जगणे शक्य झाले आहे. तरीही ग्रामीण भागात आजही अनेक मिथके जिवंत आहेत, एड्स स्पर्शाने पसरतो, भांडी शेअर केल्याने होतो, रक्तदानातून किंवा एकत्र बसल्याने लागतो अशी चुकीची धारणा अनेकांची आहे. या अज्ञानामुळे तपासणी न करण्याकडे झुकणारा मानसिकतेचा अडसर निर्माण होतो, आणि वेळेवर उपचार मिळत नाहीत. समाजाने रोगापेक्षा त्या रोगाशी जोडलेल्या चुकीच्या समजुतींविरुद्ध लढा देणे आवश्यक आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर एड्स ही केवळ आरोग्य समस्या नाही, तर सामाजिक अन्याय, गरीबी, लैंगिक असमानता, दलित-वंचित गटांवरील भेदभाव, स्थलांतर, हिंसा, वेश्या व्यवसाय, औषधांचे व्यसन, लैंगिक शिक्षणाचा अभाव आणि लिंगविषयक पूर्वग्रह यांचे प्रतिबिंब आहे. एचआयव्हीचा प्रसार जिथे जास्त आहे तेथील लोकसंख्या ही केवळ वैद्यकीय दृष्ट्या नाही तर सामाजिक दृष्ट्याही असुरक्षित आहे. स्थलांतरित कामगार, लैंगिक हिंसा सहन करणाऱ्या महिला, तृतीयपंथी समुदाय, वेश्या व्यवसायात असलेल्या महिला, इंजेक्शनच्या माध्यमातून ड्रग्ज घेणारे व्यक्ती, तरुण वयातील लैंगिक शिक्षणापासून वंचित विद्यार्थी आणि उपेक्षित समुदाय हे सर्व जास्त धोक्यात असतात. त्यांच्या जीवनातील असुरक्षितता आणि संसाधनांचा अभाव हा संसर्गाच्या जोखमीला वाढवतो.

विशेषतः महिलांच्या संदर्भात एड्सचा प्रश्न समाजातील पितृसत्ताक रचनेशी थेट जोडलेला आहे. अनेक महिलांना विवाहानंतरही सुरक्षित लैंगिकतेबद्दल निर्णय घेण्याचा अधिकार नसतो. कौटुंबिक नातेसंबंधातील असमानता महिलांना एड्सच्या धोक्यापासून दूर रहाण्याचा अधिकार हिरावून घेते. समाजात अजूनही 'पुरुषांच्या लैंगिक वर्तनाबाबत सहनशीलता' आणि 'स्त्रियांनी शांतपणे स्वीकारण्याची अपेक्षा' ही मानसिकता अनेक ठिकाणी दिसते. त्यामुळे एड्सविरोधातील लढाई ही स्त्री-पुरुष समानतेची लढाईही आहे.

तृतीयपंथी समुदायाची स्थिती आणखी गुंतागुंतीची आहे. सामाजिक बहिष्कार, रोजगाराचा अभाव, शिक्षणातील दुय्यमता आणि आरोग्य व्यवस्थेतील दुर्लक्षामुळे त्यांना उपचार, समुपदेशन आणि सन्मानाने सेवा मिळणे कठीण ठरते. समाजाने लैंगिकता आणि लैंगिक अभिव्यक्तीच्या विविधतेला स्वीकारल्याशिवाय एड्स नियंत्रणाचा उद्देश पूर्ण होणार नाही.

एचआयव्ही प्रतिबंधामध्ये जागरूकता, सुरक्षित लैंगिकतेचा प्रसार, रक्त आणि सुईंचे सुरक्षित नियमन, लैंगिक शिक्षण, समुपदेशन आणि तपासणी यांना फार महत्व आहे. परंतु त्याहून अधिक महत्वाची गोष्ट म्हणजे समाजाची मानसिकता बदलणे. एचआयव्हीग्रस्त व्यक्तींविषयीचा तिरस्कार संपला पाहिजे. त्यांच्याशी गुन्हेगारासारखे नव्हे तर सहानुभूती, सन्मान आणि समजुतीने वागण्याची गरज आहे. आजाराशी झुंज देणाऱ्या व्यक्तीला समर्थनाची आवश्यकता असते, न्यायाची नव्हे.

आज तंत्रज्ञानाद्वारे माहिती मिळवणे सोपे झाले आहे आणि युवा पिढी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारत आहे, ही बदलाची खूण आहे. शाळा-कॉलेज स्तरावर आरोग्य आणि लैंगिक शिक्षण अनिवार्य होणे गरजेचे आहे. माध्यमांनी सनसनाटीपेक्षा जागरूकतेची भूमिका निभावली पाहिजे. डॉक्टर, समाजशास्त्रज्ञ, स्वयंसेवी संस्था, शासन आणि नागरिक यांनी एकत्रितपणे वैज्ञानिक माहिती, संवेदनशीलता आणि मानवाधिकार यांवर आधारित कार्ययोजना राबवणे आवश्यक आहे.

एड्सविरोधातील चालू मोहिमेत 'उपचार', 'प्रतिबंध' आणि 'जागरूकता' यांच्याबरोबरच 'मानवता' आणि 'समानतेचा अधिकार' हे दोन मुद्दे केंद्रस्थानी असायला हवेत. कारण एड्सविषयीचा सर्वात मोठा धोका हा रोग नाही, तर त्याच्याशी जोडलेला कलंक, भीती आणि सामाजिक न्यायाचा अभाव आहे. समाज बदलला, विचार बदलले, आणि प्रत्येक व्यक्तीला न्याय्य सन्मान मिळाला तर एड्स हा आजार नियंत्रणात आणणे आणि भविष्यात त्याचे उच्चाटन करणे शक्य होईल.

म्हणूनच जागतिक एड्स दिन आपल्याला आठवण करून देतो की, एचआयव्हीग्रस्त व्यक्ती 'इतर' कोणी नाही तर तो आपल्याच समाजाचा, आपल्या मानवतेचा भाग आहे. आजारी शरीराला औषध मिळते, पण जखमी मनाला स्वीकार, आधार आणि सन्मान लागतो. आणि जेव्हा समाज उपचाराइतकाच सन्मान देईल, तेव्हा एड्सविरोधातील खरी लढाई जिंकली जाईल.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. ९९६०१०३५८२,

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# कल्याण डोंबिवलीत भाजपा-शिवसेनेत तणाव; प्रदेशाध्यक्ष चव्हाणांसमोर शिवसेनेची जोरदार घोषणाबाजी

दैनिक आपला विदर्भ



**ठाणे/प्रतिनिधी :** डोंबिवली पश्चिम भागातील कुंभारखाण पाडा परिसरात गणेश घाट आणि रागाई मंदिर प्रवेशद्वाराच्या उद्घाटनावेळी भाजपा आणि शिवसेनेच्या शक्तीप्रदर्शनामुळं वातावरण तापले होतं. दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर बॅनरबाजी आणि घोषणाबाजी करत परिसरात राजकीय शक्ती दाखवण्याचा प्रयत्न केल्यानं तणावाची परिस्थिती निर्माण झाली. विशेष म्हणजे, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या समोरच शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केल्यानं परिसरात राजकीय तणाव वाढल्याचं पाहायला मिळालं. याठिकाणी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

शिवसेना कार्यकर्त्यांनी आरोप केला की शिवसेनेचे माजी नगरसेवक विकास म्हात्रे आणि कविता म्हात्रे यांच्या स्वागताचे बॅनर जाणूनबुजून झाकण्यात आले. त्यामुळं उद्घाटनाच्या पार्श्वभूमीवर शिवसेना आणि भाजपामध्ये वाद झाला. उद्घाटनासाठी भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण उपस्थित असताना शिवसेना कार्यकर्त्यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन केलं. त्याचवेळी भाजपा कार्यकर्त्यांनी शिवसेनेसमोर घोषणाबाजी करत प्रत्युत्तर दिलं. त्यामुळं परिसरात मोठा गोंधळ निर्माण झाला होता.

यामुळं भाजपा कार्यकर्त्यांमध्ये नाराजी : उद्घाटनासारख्या कार्यक्रमात दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून झालेली बॅनरबाजी, घोषणाबाजी आणि शक्ती प्रदर्शनामुळं परिसरात तणाव निर्माण झाला होता. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कल्याण डोंबिवलीत राजकीय वातावरण तापलं आहे. विशेष म्हणजे उद्घाटन सोहळ्यापूर्वीच भाजपा आणि शिवसेनेचे कार्यकर्ते आमने-सामने आल्यामुळं तणावनाची परिस्थिती निर्माण झाली होती. अलीकडेच शिवसेनेत प्रवेश केलेले विकास म्हात्रे आणि त्यांची पत्नी कविता म्हात्रे यांच्या समर्थकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहून शक्तीप्रदर्शन केलं. यामुळं भाजपा कार्यकर्त्यांमध्ये नाराजी होती. त्यामुळ भाजपा कार्यकर्ते शिवसेनेविरोधत कुरघोडी करणार असल्याच बोललं जात आहे. या संदर्भात भाजपा प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्य्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु बैठकीत व्यस्त असल्याचं कारण देत प्रतिक्रिया दिली नाही.

## लखनौमध्ये अडकलेल्या १६ ठाणेकर विद्यार्थ्यांची सुटका; सोमवारी विमानाने मुंबईत येणार

**ठाणे/प्रतिनिधी :** स्काऊट-गाईडच्या शिबिरासाठी लखनौमध्ये गेलेल्या आणि रेल्वे चुकल्यामुळे शुक्रवारपासून तिथंच अडकलेल्या १६ विद्यार्थी आणि दोन शिक्षकांची परतण्याची व्यवस्था राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस जितेंद्र आव्हाड यांनी केली. सोमवारी (दि. १) हे विद्यार्थी सकाळी नऊच्या विमानानं लखनौहून मुंबईत परतणार आहेत.

जितेंद्र आव्हाडांनी केली मुलांची केली सुटका : ठाण्यातील बेडेकर शाळेत सातवी ते नववीच्या वर्गात शिकणाऱ्या १६ विद्यार्थ्यांचा कॅम्प उत्तर प्रदेश येथील लखनौमध्ये गेला होता. शुक्रवारी त्यांची परतण्याची गाडी होती. मात्र, स्टेशनला उशिरा पोहोचल्याने त्यांची गाडी निघून गेली. त्यामुळं त्यांना स्टेशन परिसरातच रात्र काढावी लागली. शुक्रवारीसोबत असणाऱ्या शिक्षकांनी एका खासगी ट्रॅव्हल्स कंपनीकडून बस आरक्षित केली. बस मालकानं ३५ हजार रूपये घेतले. अन् चारबाग परिसरात वाहनात बिघाड झाल्याचं सांगून पोबारा केला. त्यानंतर हे सर्वजण एका धर्मशाळेत आश्रयाला गेले. या मुलांच्या पालकांपैकी एकानं ही बाब राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांना सांगितली. प्रधान यांनी ही बाब लगेच आमदार जितेंद्र आव्हाड यांना कळवली. यानंतर जितेंद्र आव्हाड यांनी सर्वात आधी विद्यार्थ्यांच्या निवासाची आणि जेवणाची व्यवस्था केली. तसेच, तेथील काही लोकप्रतिनिधींशी चर्चा करून सोमवारी सकाळी ९ च्या विमानाची तिकिटे आरक्षित केली. हे सर्व विद्यार्थी सोमवारी साडेबारा वाजेपर्यंत मुंबईत येणार आहेत.

पालकांनी सोडला नि:श्वास : मागील दोन दिवसांपासून आपली मुले घरी कधी येणार याची चिंता पालक आणि नातेवाईक यांच्या सोबत शाळा महाविद्यालय प्रशासनाला होती अशा वेळी मदत कशी पोहचेल यासाठी धावपळ करणारे पालक आता या म दतीमुळे आश्वस्त झाले.

## कोल्हापूरात तंबाखू मुक्त युवा अभियान ३.० अंतर्गत भव्य बाईक रॅली; जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम (छढउझ), सीपीआर हॉस्पिटल कोल्हापूर आणि रोट्रॅक्ट क्लब ऑफ घखढ सनशाईन यांच्या संयुक्त विद्यमाने ''तंबाखू मुक्त युवा अभियान ३.०'' अंतर्गत रविवारी कोल्हापूर शहरात जनजागृतीपर युवा बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीचे उद्घाटन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते झाले.

उद्घाटन प्रसंगी बोलताना जिल्हाधिकारी श्री. येडगे म्हणाले, आजचे तरुण फॅशन, मित्रांच्या संगतीत, नोकरीतील प्रमोशन, पार्ट्या किंवा सोशल मीडियावरील इतरांचे अनुकरण करताना तंबाखू आणि ड्रग्ससारख्या व्यसनांच्या आहारी जात आहेत. ही अत्यंत गंभीर बाब आहे. तरुण पिढी ही राष्ट्राची खरी संपत्ती आहे. राष्ट्र उभारणीची ताकद फक्त तरुणांमध्येच आहे. म्हणून प्रत्येक तरुणाने स्वत:सह आपल्या मित्रपरिवाराला व्यसनांपासून दूर ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रशांत वाडीकर यांनी तरुणांमधील वाढत्या व्यसनाधीनतेबद्दल चिंता व्यक्त करीत व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध पिंपळे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. थोरात, जिल्हा सल्लागार (छढउझ) डॉ. व्ही. ए. आरळेकर, दंतवैद्य डॉ. अर्चना पाटील तसेच रोट्रॅक्ट क्लब सनराइजचे अध्यक्ष राहुल कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. जिल्हा सल्लागार डॉ. व्ही. ए. आरळेकर यांनी अभियानाचा आढावा सादर करून जिल्ह्यात सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

## होमगार्ड पतीने श्रद्धांजली स्टेट्स ठेवत पत्नी, दोन चिमुकल्यांची केली हत्या अन् मग उचलले टोकाचे पाऊल

**नाशिक/प्रतिनिधी :**पतीने सोशल माध्यम ावर श्रद्धांजलीचे स्टेटस ठेवत पत्नी आणि दोन मुलांना संपवले, त्यानंतर आत्महत्या केल्याने मोठी खळबळ उडाली. ही घटना देवळा तालुक्यातील फुले माळवाडी शिवारात आज सकाळी उघडकीस आहे. एकाच कुटुंबातील चार जण मृतावस्थेत आढळल्याने नागरिकांना मोठा हादरा बसला आहे. ४० वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याचे दिसून आले. तर पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी यांचा मृतदेह झोपलेल्या अवस्थेत असल्याचे प्रथम दर्शनी समोर आले. आत्महत्येपूर्वी तरुणाने आपल्या मोबाइलमध्ये ''श्रद्धांजली'' स्टेट्स ठेऊन आत्म हत्या केली. मात्र या सर्वांच्या मृत्यूचं कारण अद्याप कळू शकलेले नाही. हसते खेळते कुटुंब उद्धवस्त झाल्यानं देवळा तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे.

नाशिक जिल्ह्यातील देवळा तालुक्यातील फुले माळवाडी इथं राहणारे गोविंद बाळू शेवाळे (वय ४०) यांचा मृतदेह लटकलेल्या अवस्थेत आढळला आहे. तर त्यांची पत्नी कोमल गोविंद शेवाळे (वय ३५) खुशी गोविंद शेवाळे (वय ८) आणि शाम गोविंद शेवाळे (वय दीड वर्ष) यांचे मृतदेह पलंगावर झोपलेल्या अवस्थेत आढळून आले. या घटनेची माहिती मिळताच देवळा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करत अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

फॉरेन्सिक टीम करणार तपास : ''सामूहिक आत्महत्येच्या घटनेच्या तपासासाठी नाशिक विभागीय फॉरेन्सिक टीमला बोलवण्यात आले होते. पोलिसांकडून पंचनामा करण्यात आला आहे. मृतदेह पोस्टमार्टमसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठवले आहेत. कुटुंबानं असा टोकाचा निर्णय का घेतला ? याबाबत अद्याप कारण समोर आलेलं नाही,'' अशी माहिती देवळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सार्थक नेहेते यांनी दिली आहे.

गोविंदा शेवाळे यांनी हे टोकाचं पाऊल उचलण्यापूर्वी शनिवारी रात्री उशीरा पत्नी, दोन्ही मुलांना जेवणातून काही विषारी द्रव्य खाऊ घातलं. त्या तिघांचा रात्री उशीरा झोपेतच मृत्यू झाला. हा प्रकार पाहून गोविंद यानं रविवारी सकाळी व्हॉट्स ॲपवर 'भावपूर्ण श्रद्धांजली' असं स्टेट्स टाकलं. हे स्टेट्स शेवाळे यांच्या लहान भावानं पाहिलं आणि त्याला काहीतरी अनुचित घडल्याची शंका आली. याची खातरजमा करण्यासाठी त्यानं तत्काळ इतर नातेवाईकांना माहिती दिली. नातेवाईक शेवाळे कुटुंबीयांच्या घरी पोहोचल्यावर शेवाळे यांची पत्नी आणि मुलं झोपलेल्या अवस्थेत, तर शेवाळे यांनी गळफास घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. शेवाळे यांच्या शेजाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शेवाळे कुटुंब साधे, शांतपणे जगणारे म्हणून ओळखले जात होते. मात्र गेल्या काही महिन्यांत घरातील आर्थिक आणि वैयक्तिक स्वरूपाचे ताण वाढल्याची चर्चा स्थानिकांमध्ये होती. पोलिसांनी मात्र कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचण्यास नकार देत सर्व घटकांवर तपास सुरू ठेवला आहे.

## निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी योग्य नियोजन करा - जिल्हाधिकारी

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** शेवटच्या टप्प्यातील आदर्श आचारसंहितेचे पालन, मतदान, मतम ोजीणी अशा सर्व प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी सुयोग्य पध्दतीने नियोजन करा, अशा सूचना जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी आज सर्व नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना दिल्या. सर्व नगरपंचायत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसोबत जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्यप्रणालीद्वारे आढावा बैठक घेण्यात आली.आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूम ीवर जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर पुरेशा प्रकाश योजनेची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. संध्याकाळी लवकर अंधार पडत असल्याने लाईट व्यवस्था सुरळीत राहील याची विशेष दक्षता घ्यावी. अचानक वीज पुरवठा खंडित झाल्यास बॅटरी उपलब्ध ठेवावी, तसेच संवेदनशील मतदान केंद्रांवर पोलीस बंदोबस्त वाढवावा अशा सूचना जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी या आढावा बैठकीत सर्व तहसीलदारांना दिल्या.

## दोन बसची समोरासमोर टक्कर; ११ प्रवाशांचा मृत्यू, अनेक जखमी

चेन्नई (तामिळनाडू) : तामिळनाडूच्या शिवगंगा जिल्ह्यात रविवारी झालेल्या भीषण रस्ते अपघातात अकरा जणांचा मृत्यू झालाय. या अपघातात अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं असल्याची माहिती जिल्हा प्रशासनानं दिली. शिवगंगा जिल्हा पोलीस अधीक्षक (एसपी) शिवा प्रसाद यांनी सांगितलं की, तिरुपत्तूरजवळ दोन बसेस समोरासमोर आदळल्यानं हा अपघात झाला. या अपघातात ११ जणांचा मृत्यू झाल्याची माहितीही त्यांनी दिली. अपघातानंतर स्थानिकांनी मदतकार्य करत अनेकांचे जीव वाचवले.


रविवारी संध्याकाळी शिवगंगा जिल्ह्यातील कुम्मनगुडीजवळ दोन सरकारी बसेसची समोरासमोर टक्कर झाली. यामध्ये ११ जणांचा मृत्यू झाला आणि २० हून अधिक जण जखमी झाले आहेत, असं एका पोलीस अधिकाऱ्यानं सांगितलं. मृत्यूचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

या भीषण अपघातात दोन बसेसचं मोठं नुकसान झालंय. अपघातानंतर स्थानिक नागरिकांच्या मदतीनं अनेक जखमींना वाहनांमधून बाहेर काढण्यात आलं. त्यानंतर लगेच या जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. यातील एक बस तिरुप्पूरहून कराईकुडीला जात होती, तर दुसरी कराईकुडीहून दिंडीगुल जिल्ह्यात जात होती. यावेळी हा भीषण अपघात झाला.



तत्पूर्वी, २४ नोव्हेंबर रोजी तामिळनाडूच्या तेनकासी जिल्ह्यात दोन बसेसची समोरासमोर टक्कर झाली होती. यामध्ये सात प्रवासी ठार झाले होते आणि ५० हून अधिक जण जखमी झाले होते. मदुराई-कोल्लम राष्ट्रीय महामार्गावरील कडायनल्लूरजवळ हा अपघात झाला होता.

## शब्दकोडे क्र. 24



आडवे शब्द

१. लोकमान्यांचे पूर्ण नाव ६. एकमेकांपुढे १०. युद्ध ११. दहा १२. फालतू वस्तू १५. गाय १६. सोने १९. सडक, पथ २०. धमकी २३. निर्लज्ज २५. एकमेकांची दृष्टीभेट २९. मिसळीतील उसळ ३१. सहाय्य ३३. पर्वत, अस्सल माल ३४. जवळ, उत्तीर्ण ३७. घालमेल, तळमळ, अशांतता ३९. नम्रतेने वागणारा ४१. भारवाहक ४३. विद्युल्लता ४४. मोजणारा ४६. धपाटा, चापट ४७. जीव (हिंदी) ४९. रममाण होणे, पती ५०. नाहक द्वेष (ला.) ५३अ. बोटाच्या टोकावरील कडक आवरण ५४. गोळा करणे, एकत्र करणे ५६. तरच्या बरोबरचा शब्द ५७. रम्य, सुंदर ५९. भविष्य सांगण्याची एक विद्या ६१. प्राण ६३. गाणे ६५. पाठविलेला ६७. क्रिकेटमधील धाव ६९. निरंतर साधना ७१. मवाळ धोरण ७३. कडक, न दबणारे ७४. चणचण, दुर्भिक्ष्य ७६. चक्र ७७. हालचाल ८०. तपस्या ८२. पदार्थावरील छोटा तुकडा ८३. धोबी ८४. संतोषजनक

उभे शब्द

१. चोख सोने २. गंगेचे पाणी ३. टक्कर ४. थेंब, स्वल्पांश ५. दफनभूमी ६. समतल ७. धान्याचा ढीग ८. शहाणा, सूज्ञ ९. मयूर १३. टिंगल १४. दात १७. मऊ १८. लाज, लज्जा २१. टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास २३. दुही, भांडण २४. सहायक, मदत करणारा २६. आपले राष्ट्रगीत २७. संताप, क्रोध २८. उणीव भरून काढणे (वा.प्र.) ३०. डाक, पत्र ३२. टिकून राहणे ३४. च्या जवळ ३५. सहजगत्या ३६. व्यवसाय, उद्योग ३८. सुसर ४०. कलंक, डाग ४२. माणूस ४५. बळकट ४८. सैनिकांसाठी स्फूर्तीगीत ५१. तृतीया ५२. दारूचा एक प्रकार ५३. विष ५५. वाटप, वितरीत करणे ५८. पाठवणी ६०. साय ६२. चेहरा, मुख ६४. उष्णतेचे प्रमाण ६६. महिला, बाई ६८. नक्कल करणारा ७०. आश्चर्य ७२. सन्मानाची अल्प रक्कम ७३. दारावरील खुणेचा आवाज ७४. उपयोग ७५. लिहिलेले वाचणारा ७८. रंग ७९. रक्तवाहिनी ८०. छक्केपंजे नसणारा, सरळमार्गी ८१. चौक

### शब्दकोडे क्र. 23 चे उत्तर

आडवे उत्तर

१.धुंद येथ मी स्वैर झोकितो मद्याचे प्याले ९.दीर १०.टाक ११.कुत्रा १२.वायव्य १४.कणीदार १६.रचनाकर १९.राजा २०.थारा २१.हत्या २२.नवार २४.व २५.वानर २७.यच्चयावत ३०.हरामखोर ३२.वडवानल ३३.सटरफटर ३६.महती ३८.कद ४०.मदार ४१.हार ४२.वा ४३.सटवाई ४५.रफ ४६.कप ४९.काल ५०.खारट ५२.लघळपणा ५४.रत्नजडित ५५.नाना ५६.वासा ५८.मळमळणे ५९.सन ६१.पुणे ६२.वेताळ ६४.खरा ६५.कळ ६६.रामराम ६८.पारावार ६९.तपास ७१.मरुत ७३.जननमरण ७४.वाऱ्यावरची वरात

उभे उत्तर

१.धुंदी २.दरवाजा ३.मीन ४.रमणीय ५.तोटा ६.मकर ७.चेतना ८.लोकुरवाळा १३.व्यथा १५.रहस्यमय १७.चलन १८.कान १९.राम ायण महाभारत २३.मायावती २५.वारसदार २६.रबर २८.वड २९.तवाना ३०.हलकट ३१.पोरका ३४.टरफल ३५.फटकळ ३७.हर ३९.दवाखाना ४३.सल ४४.ईर ४७.पपनस ४८.सजविणे ४९.कातरवेळ ५१.टवाळ ५३.घटणे ५५.नाताळ ५७.सामदाम ५८.मलम ६०.नवरस ६१.पुरातन ६३.सैरावैरा ६५.कसम ६६.रातवा ६७.राघव ७०.पान ७१.मण ७२.चाची

# न्यायालयीन अपील दाखल झालेल्या नगरपरिषदामधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुधारित निवडणुक कार्यक्रम

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील शेगाव, खामगाव, जळगाव जामोद, आणि देऊळगाव राजा नगरपरिषदामध्ये अपील दाखल करण्यात आले होते. त्या अपीलांवरील निकाल २२/११/२०२५ रोजी पर्यंत होणे आवश्यक होते. जेणेकरुन संबंधित उमेदवारास त्याचे नामनिर्देशनपत्र मागे घेण्यासाठी महाफराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ मधील नियम १७ (१) (ब) नुसार तीन दिवसाचा कालावधी मिळाला असता व त्यानंतर २६ नोव्हेंबर २०२५ रोजी वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारास निवडणूक चिन्ह वाटप करणे नियमानुसार योग्य ठरले असते, परंतु नियमाचे उल्लंघन झाल्याने राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम रद्द करून नव्याने निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे.



सुधारित कार्यक्रमानुसार देऊळगाव राजा संपूर्ण नगर परिषदेची निवडणूक रद्द करून नव्याने कार्यक्रम जाहीर केला आहे., खामगाव नगरपरिषदे मधील प्रभाग क्र. ५ अ, ७ अ, ९ ब, १६ ब या जागेवरील निवडणुक सुधारित वेळा पत्रका प्रमाणे होणार आहे. शेगाव नगरपरिषद प्रभाग क्र. ४ अ व ४ ब, जळगाव जामोद नगर परिषद प्रभाग क्र. ६ अ., ६ ब व ७ ब, या जगासाठी निवडणूक प्रक्रिया नव्याने राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील शेगाव, खामगाव, व जळगाव जामोद या नगरपरिषदेतील अपीलाचा निकाल संबंधित जिल्हा न्यायालयाकडून २२ नोव्हेंबर २०२५ नंतर म्हणजेच २५ नोव्हेंबर २०२५ रोजी देण्यात आलेला आहे. त्यामुळे उपरोक्त नगरपरिषदांमध्ये सदस्य पदाच्या जागेच्या निवडणुका ४ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या कार्यक्रमानुसार घेण्यात येणार नाही. तसेच देऊळगाव राजा नगरपरिषदेमध्ये अध्यक्ष पदाचा समावेश असल्या कारणाने संपूर्ण नगरपरिषदेची निवडणूक स्थगित करण्यात आली आहे व ती २९ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या सुधारित वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात येणार आहे. निवडणुकीचा टप्पा नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत, आवश्यकते प्रमाणे निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक ११ डिसेंबर २०२५, मतदानाचा दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत, मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून व २३ डिसेंबर रोजी शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे असा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

## वृत्तविशेष...

### निवडणूक प्रचारासाठी सोमवारी रात्री १० पर्यंत मुदत

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होत असून, त्यासाठीच्या जाहीर प्रचाराची मुदत महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार १ डिसेंबर रोजी रात्री १० पर्यंत मुदत वाढविण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांस संबंधीत कायद्यांमधील तरतुदींनुसार घेतल्या जातात. नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसंदर्भातील कायद्यात जाहीर प्रचाराचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार मतदान सुरू होण्याच्या अगोदरच्या दिवशी म्हणजे १ डिसेंबर रोजी रात्री १० वाजल्यापासून प्रचार पूर्णपणे बंद होणार आहे. त्यानंतर प्रचारसभा, मोर्चे आणि ध्वनिक्षेपकाचा वापर करता येणार नाही. त्याचबरोबर निवडणूक प्रचाराशी संबंधीत जाहिरातींची प्रसिद्धी किंवा प्रसारण करता येणार नाही.असे राज्य निवडणूक आयोगाने कळविले आहे.

### मतदानाच्या दिवशी मतदार कामगारांना भर पगारी सुट्टी द्या – जिल्हाधिकारी अमोल येडगे

**दैनिक आपला विदर्भ**

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** राज्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी आज कामगार विभाग आणि विविध औद्योगीक असोसिएशन पदाधिकारी व मालक प्रतिनिधी यांच्या सोबत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे महत्त्वाची बैठक घेतली. यात त्यांनी स्पष्ट सूचना दिल्या की, दिनांक ०२ डिसेंबर २०२५ रोजी होणाऱ्या मतदानाच्या दिवशी जिल्हातील आस्थापनांमधील मतदार कामगार, कर्मचारी व अधिकाऱ्यांना लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५१ च्या कलम १३५ (ब) नुसार भर पगारी सुट्टी देणे बंधनकारक आहे.

सहाय्यक कामगार आयुक्त विशाल घोडके यांनी याबाबतचे विस्तृत पत्रक जारी केले असून, त्यात निवासी हॉटेल, खाद्यगृहे, नाट्यगृहे, मॉल्स, शॉपिंग सेंटर, आयटी कंपन्या, कारखाने आदी सर्व आस्थापनांचा समावेश आहे. अपवादात्मक परिस्थितीत (सतत चालणाऱ्या प्रक्रिया किंवा लोकोपयोगी सेवा) कमीत कमी तीन तासांची विशेष सवलत देणे बंधनकारक राहील असे जिल्हाधिकारी श्री. येडगे यांनी सूचित केले . तसेच कोणत्याही आस्थापनांनी मतदाना करीता कामगारांना सुट्टी नाकारल्यास कामगारांनी तात्काळ कामगार विभागाकडे ८७८८०१४५१३ या क्रमांकावर तक्रार नोंदवावी.

प्रत्येक मतदाराला आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. तसेच संबंधित आस्थापनांना याबाबत काही आक्षेप असल्यास याबाबत दि. १ डिसेंबर रोजी दुपारी १२.०० वा. जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित राहावे असे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी सांगितले. या बैठकीस कागल इंडस्ट्रियल असोसिएशनचे चेअरमन, इचलकरंजी टेक्सटाईल असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

### बदलापूरमध्ये मोठा राडा, निवडणूक अधिकाऱ्यांशी बाचाबाची; मोठा पोलीस बंदोबस्त तैनात, छावणीचे स्वरुप

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रचाराचा आज 'सुपर संडे' आहे. सोमवारी रात्री प्रचाराच्या तोफा थंडावणार आहेत. निवडणुकांचा प्रचार सध्या अंतीम टप्प्याक आहे. मात्र, त्याआधीच निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील काही निवडणुका पुढे ढकलण्यात आल्याचे निवडणूक आयोगाने सांगितले आहे. एकनाथ शिंदेंचा बालेकिल्ला असलेल्या बदलापूरची निवडणूक पुढे ढकलली आहे. फक्त बदलापूर नाही तर राज्यातील २० जिल्ह्यातील नगरपालिकांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या असून या ठिकाणच्या निवडणुका पुढील काही दिवसांनी होणार आहेत.या निवडणुका पुढे ढकलल्याने बदलापूरमध्ये मोठा गोंधळ पाहायला मिळाला आहे.

बदलापूरची निवडणूक २० दिवसांनी लांबणीवर गेल्याने मोठा गोंधळ उडाल्याचे पाहायला मिळाले आहे. नगरपरिषद निवडणुकीच्या सहा जागांसाठीचं मतदान पुढे ढकलल्याने कोणाला मोठा गोंधळ झाल्याचे पाहायला मिळाला. निवडणूक निर्णय अधिकारी, उमेदवार आणि नागरिकांमध्ये बाचाबाची झाली. त्यामुळे काही वेळासाठी तणावाचे वातावरण पाहायला मिळाले.

नेमकं काय घडलं?

बदलापूर नगर परिषदेच्या सहा जागांसाठीची निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. त्या संदर्भाची काय प्रक्रिया असेल यासाठी माहिती देण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी एक बैठक आयोजित केली होती. मात्र त्या बैठकीत मोठ्या प्रमाणात गोंधळ उडाला. या सहा जागांमधील उमेदवारांना योग्य उत्तर मिळत नसल्याचा आरोप करत त्यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसमोर गोंधळ घातला. सध्या या ठिकाणी वातावरण प्रचंड तापल असून मोठ्या प्रमाणात गोंधळ उडालाय. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांची कुमक या ठिकाणी अधिकाऱ्यांनी मागवली आहे.

## महाराष्ट्राने उंचावली देशाची मान! 'गोंधळ' चित्रपटाने जिंकला जागतिक स्तरावरचा मानाचा पुरस्कार

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी सिनेसृष्टीसाठी आणि महाराष्ट्राच्या कला परंपरेसाठी अत्यंत अभिमानास्पद आणि ऐतिहासिक बातमी! गोव्यामध्ये नुकत्याच पार पडलेल्या भारत सरकारच्या ५६ व्या इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडिया म्हणजेच घ्इइघ २०२५ मध्ये, अस्सल मराठी मातीत रुजलेल्या 'गोंधळ' या चित्रपटाने थेट आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली ताकद सिद्ध केली आहे. 'गोंधळ'ने 'सिल्व्हर पिकॉक इंटरनॅशनल सेक्शन' मध्ये सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा बहुमान पटकावला आहे. विशेष म्हणजे, गेल्या ५६ वर्षांच्या 'इफ्फी'च्या इतिहासात पहिल्यांदाच मराठी चित्रपटाला 'सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक'चा हा सर्वोच्च पुरस्कार मिळाला आहे.यंदा 'इफ्फी'मध्ये ११३० चित्रपटांची नोंदणी झाली होती, त्यातील ५७० फिचर फिल्म्समधून हा पुरस्कार 'गोंधळ'ला मिळाला आहे. या पुरस्काराचे स्वरूप पंधरा लाख रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे आहे. २०१९ मध्ये 'जल्लीकट्टू' चित्रपटासाठी लिजो जोस यांना 'सिल्व्हर पिकॉक सेक्शन'मध्ये सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळाला होता. त्यानंतर कोणत्याही भारतीय चित्रपटाला हा पुरस्कार मिळाला नव्हता. यंदा 'गोंधळ'च्या निमित्ताने हा मान पुन्हा भारताला मिळाला आहे.विशेष म्हणजे, संतोष डावखर यांनी या चित्रपटातून दिग्दर्शनात पदार्पण केले आहे. पदार्पणाच्या पहिल्याच चित्रपटासाठी त्यांना थेट 'सर्वोत्कृष्ट दिग्दर्शका'चा अवॉर्ड मिळणे, ही त्यांच्यासाठी खूप मोठी कामगिरी आहे. हा सोहळा गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासह रजनीकांत, रणवीर सिंग, नवाजुद्दीन सिद्दीकी यांसारख्या दक्षिणात्य आणि बॉलिवूडमधील सुपरस्टार्सच्या उपस्थितीत संपन्न झाला.

## अनेक भारतीयांना आपली मातृभाषाच येत नाही, मोहन भागवत यांनी व्यक्त केली खंत

**दैनिक आपला विदर्भ**




**नागपूर/प्रतिनिधी :** संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या 'श्री ज्ञानेश्वरी' या पुस्तकाच्या इंग्रजी आवृत्तीचा प्रकाशन सोहळा सरसंघचालक मोहन भागवत यांच्या उपस्थितीत रविवारी नागपूर येथे पार पडला. यावेळी बोलताना भागवत यांनी समाजाला भाषिक वारशाच्या ऱ्हासावर आत्मपरीक्षण करण्याचं आवाहन केलं. ''सध्या परिस्थिती अशा टप्प्यावर पोहोचली आहे. की, आज काही भारतीय लोकांना आपल्या स्वत:च्या भाषा येत नाहीत,'' असं म्हणत त्यांनी भारतीय भाषा आणि मातृभाषांचा वापर कमी होत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली.

एकेकाळी संपूर्ण संवाद, देवाणघेवाण, दैनंदिन व्यवहार संस्कृतमध्ये व्हायचे. सध्या काही अमेरिकन प्राध्यापक आपल्याला संस्कृत शिकवतात. परंतु, सगळ्या जगाला आपण संस्कृत शिकवली पाहिजे. आजकालच्या अनेक मुलांना काही अगदी सोपे आणि मूलभूत शब्द माहिती नाहीत. परंतु, ते घरी त्यांच्या मातृभाषेचा आणि इंग्रजीचा वापर करून बोलतात. परिस्थिती अशा टप्प्यावर पोहोचली आहे की, काही भारतीय लोकांनाच आपल्या भारतीय भाषा येत नाहीत. जर आपण आपल्या घरात आपली भाषा व्यवस्थित बोलू शकलो तर परिस्थिती चांगली होईल. पण, आपण ते करत नाही,'' अशी खंत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी व्यक्त केली.आता समस्या अशी आहे की, इंग्रजी भाषेत पुरेसे शब्द नाहीत. जे आपल्या भाषांमध्ये व्यक्त होणाऱ्या विचारांचे किंवा संकल्पनांचे सार आणि खोली समजतात. ज्ञानेश्वरांनी वापरलेल्या एका शब्दासाठी अनेकदा अनेक इंग्रजी शब्दांची आवश्यकता असते. परंतु, त्याचा अर्थ पूर्णपणे व्यक्त होत नाही. कल्पवृक्षाचे इंग्रजीत भाषांतर कसं कराल? सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध संकल्पनांचे परदेशी भाषेत भाषांतर करण्याच्या मर्यादांवर भर दिला. अशी उदाहरणे भारतीय भाषांचे जतन आणि बळकटीकरण का केलं पाहिजे हे अधोरेखित करतात. जिथे श्रद्धा असते, तिथं आपण सर्वजण अभिव्यक्ती असतो. एकदा परदेशी पाहुण्यांना सांगितले होते की देव एक आहे की, अनेक यावर वाद घालणे अनावश्यक आहे. कारण देवाचं अस्तित्व केंद्रस्थानी आहे,'' असे मोहन भागवत म्हणाले.

भारतीय परंपरा लोकांना वैयक्तिक हितसंबंधांच्या पलीकडं विचार करण्यास आणि कुटुंब आणि समुदायांच्या कल्याणाचा विचार करण्यास शिकवते. हे लोकांना वेगवेगळ्या शब्दांत आणि वेगवेगळ्या स्वरूपात सांगितलं आहे. जसा पक्षी पंखांशिवाय उडू शकत नाही, त्याचप्रमाणे आपल्याला दोन पंखांची आवश्यकता आहे, ते म्हणजे ज्ञान आणि कर्म,'' असे मोहन भागवत म्हणाले.

भक्ती हेच सत्य : भगवद्गीतेमध्ये जगाच्या भूतकाळ, वर्तमान आणि भविष्यकाळाचं सत्य, ज्ञान आणि सारांश आहे. 'श्री ज्ञानेश्वरी' सारख्या प्राचीन ग्रंथांचं इंग्रजीत भाषांतर करण्यावर भर दिला जेणेकरून ते वाचताना लोक मूळ ग्रंथ शिकण्याचा प्रयत्न करतील. भक्ती हे सत्य आहे, याचा अर्थ आपण जोडलेले आहोत. ते एक आध्यात्मिक सत्य आहे. आता विज्ञानही ते समजून घेत आहे. सर्व सृष्टी मुळापासून आली आहे. जगात प्रत्येकाचं वर्तन आणि अनुभव वेगळे असतात. आपल्या देशातही भाषा, खाण्याच्या सवयी, भक्ती, चालीरीती, देवता आणि पंथ वेगवेगळे आहेत. परंतु, या सर्वांमध्ये आपण सर्व एकाच ठिकाणी जोडलेले आहोत आणि ते ठिकाण जगालाही जोडते. आपण विविधतेत एक आहोत,'' असे मोहन भागवत यांनी सांगितले.

## मिरजच्या तंतुवाद्य परंपरेला मानाचा तुरा! ज्येष्ठ सतारमेकर युसुफ घुडूलाल मुल्ला यांना उत्कृष्ट तंतुवाद्य निर्माते पुरस्कार




**मुंबई/प्रतिनिधी :** सितारेची एखादी धून मनात अगदी हवेच्या लहरीसारखी जाते आणि कितीतरी काळ घर करून राहते. ही वाजवणाऱ्या कलाकाराची जेवढी कमाल तेवढीच किंबहुना त्याहूनही काकणभर अधिक वादय बनवणाऱ्याच्या हाताची. देखणे ते हात ज्यांना निर्मितीचे डोहाळे .. ही बा.भ. बोरकर यांच्या कवितेतील या ओळी कुठल्याही तंतुवाद्य निर्मात्याला चपखल लागू पडणाऱ्या. भारतात सितार निर्मितीची परंपरा शेकडो वर्षांपासूनची आहे. मिरज हे सितार निर्मितीच्या जागांपैकी महत्त्वाचं ठिकाण. मिरजच्या समृद्ध तंतुवाद्य परंपरेला आता पुन्हा एकदा मान्यता मिळालीय. ज्येष्ठ तंतुवाद्य निर्माते युसुफ घडूलाल मुल्ला यांना राज्य शासनाने उत्कृष्ट तंतुवाद्य निर्माते म्हणून सन्मानित केलंय. सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी ही घोषणा करतात मिरज संगीत विश्वात आनंदाची लहर पसरलीय. तीन लाख रुपये, मानपत्र आणि शाल असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्कारामुळे मिरजच्या तंतुवाद्य क्षेत्रात पुन्हा एकदा मानाचा तुरा खोवला गेलाय.

युसुफ मुल्ला हे नाव तंतुवाद्य निर्मितीच्या जगतात एक वेगळी ओळख निर्माण करून गेले आहे. तब्बल साठ वर्षांहून अधिक काळ त्यांनी भारतीय पारंपरिक आणि अभिजात तंतुवाद्यांच्या निर्मितीला स्वत:ला अर्पण केले आहे. सतार, सुरबहार, तंबूरा, दिलरुबा, इसराज, सरंगी आणि अनेक दुर्मिळ तंतुवाद्यांच्या सौष्ठवपूर्ण निर्मितीत त्यांचे कौशल्य अतुलनीय मानले जाते. आज तंतुवाद्य निर्मितीत परंपरागत कौशल्य जपणारे कारागीर मोजकेच उरले आहेत, आणि या मोजक्या उस्तादांमध्ये युसुफ मुल्ला यांचे स्थान अत्यंत मानाचे समजले जाते.

त्यांच्या हातून तयार झालेल्या वाद्यांनी देश-विदेशातील संगीतविश्वाला अक्षरश: मंत्रमुग्ध केले आहे. भारतातील प्रख्यात कलाकार, संगीत विद्यापीठे, संगीतसंस्था तसेच जगभरातील संगीतप्रेमींनी त्यांच्या वाद्यांना नेहमीच पसंती दिली आहे. त्यांच्या जीएस म्युझिकल्स या तंतुवाद्यनिर्मिती केंद्राने देश-विदेशात गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे. विशेषत: अमेरिका, युरोप, मध्य पूर्व आणि आशियातील विविध देशांमध्ये त्यांच्या बनवलेल्या तंतुवाद्यांनी भारतीय संगीत परंपरेचा अनुनाद घुमवला आहे.

तंतुवाद्याच्या प्रत्येक तारेला स्वरांची प्राणप्रतिष्ठा देणारे युसुफ मुल्ला हे केवळ कारागीर नसून एक सांगीतिक परंपरेचा दुवा आहेत. भारतीय अभिजात संगीताचा आत्मा जपणाऱ्या या वाद्यनिर्मिती शिल्पकाराचा गौरव राज्य शासनाने करण्याचा निर्णय घेतला असून, तो संगीतविश्वासाठीही मोठा सन्मान आहे. या पुरस्कारामुळे मिरजच्या तंतुवाद्य परंपरेला पुन्हा एकदा जागतिक स्तरावर मानाचा तुरा प्राप्त झाला आहे.

# आयएएस राजेश अग्रवाल यांनी राज्याच्या मुख्य सचिव पदाचा पदभार स्वीकारला

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मावळते मुख्य सचिव राजेशकुमार यांच्याकडून नवनियुक्त मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आज पदभार स्वीकारला. राज्य सरकारने राज्याच्या मुख्य सचिव पदावर अग्रवाल यांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित केले होते.

मंत्रालयातील मुख्य सचिवांच्या दालनात झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनिषा वर्मा, सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा, कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव (अ.व.सु) राधिका रस्तोगी, मदत पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वैद-सिंगल, ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव श्रीकर परदेशी, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पंकज कुमार, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, पशुसंवर्धन, दुग्ध विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन, दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंडे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अमित सैनी यांच्यासह मुख्य सचिव कार्यालय व अन्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्राचा विकास आणि गौरव वाढविण्यासाठी प्रभावीपणे कार्यरत राहीन असे मुख्य सचिव पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर राजेश अग्रवाल म्हणाले.

राजेश अग्रवाल हे भारतीय प्रशासकीय सेवेतील महाराष्ट्र कॅडरचे १९८९ चे अधिकारी असून त्यांचे मूळ गाव पंजाबमधील जालंधर हे आहे. त्यांनी कॉम्प्युटर सिस्टिम विषयामध्ये बी.टेक केले आहे.



आपल्या सेवाकाळात त्यांनी सहायक जिल्हाधिकारी रत्नागिरी, जिल्हा परिषद जळगाव येथे मुख्य कार्यकारी अधिकारी, अकोला येथे जिल्हाधिकारी, महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथे उप विशेष आयुक्त, केंद्रीय ग्रामविकास राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, भारत निवडणूक आयुक्त कार्यालयात संचालक, मंत्रालय मुंबई येथे सामान्य प्रशासन विभागाचे सचिव, इंटर्नल एक्स्चेंज ऑफ इंडिया नवी दिल्ली येथे राष्ट्रीय अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, मंत्रालय मुंबई येथे कृषी, मत्स्यव्यवसाय विभागात सचिव, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागात सचिव (अतिरिक्त कार्यभार), वित्त विभागात सचिव, सामान्य प्रशासन विभागात प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान), वित्त विभागात लेखा व कोषागारे विभागात सचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार, वित्त विभागात सचिव (लेखा व कोषागारे)(व्यय – अतिरिक्त कार्यभार), केंद्र सरकारच्या वित्त सेवा विभागात सह सचिव, केंद्र सरकारच्या आदिवासी विकास विभागात सह सचिव, केंद्र सरकारच्या कौशल्य विकास विभागाचे महासंचालक (प्रशिक्षण), पेट्रोलियम आणि नॅचरल गॅस विभागात अतिरिक्त सचिव आणि वित्त सल्लागार, केंद्र सरकारच्या कौशल्य विकास विभागात सचिव, केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय विभागात सचिव, मंत्रालय मुंबई येथे सामान्य प्रशासन विभागात अतिरिक्त मुख्य सचिव अशा विविध पदांवर काम केले आहे.